**संदर्भ:-** मा. अध्यक्ष, निवड समिती, राष्ट्रिय आरोग्य अभियान तथा आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक यांची दि २७/११/२०२५ रोजीची मंजुर टिपणी

------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र./सा.आ.वि./एनयूएचएम/डेस्क-२/७४५/२०२५,
दि.- १३ /१२/२०२५

राष्ट्रिय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नाशिक महानगरपालिका स्तरावरील SENIOR MEDICAL OFFICER SNCU या कंत्राटी पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्ति कालावधी हा पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झाल्यापासुन व वैदयकिय आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे कार्यालयात रुजुपत्र सादर केल्यापासुन ते २९/०६/२०२४ या कालावधीकरीता पुढील अटी व शर्तिच्या अधिन राहुन निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ क्र | नाव | पदनाम | मासिक मानधन | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ निमसे रमेश मोतीराम | SENIOR MEDICAL OFFICER SNCU | ६०,०००/- | SNCU HINDU HRUDAY SAMRATH BALASAHEB THAKARE, HOSPITAL,NASHIK ROAD, NASHIK |

आदेश मिळालेपासुन ७ दिवसांचे आत (सुटटीचे दिवस वगळुन) पदस्थापनेच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा तुम्हास सदर नियुक्तीस रस नाही असे समजुन नियुक्ती रदद समजण्यात येईल.

कामावर रुजु होताना नियुक्ति आदेशातील अटि व शर्ती मान्य असलेबाबत रुपये १००/- च्या स्टॅप पेपरवर करारनामा वैदयकिय आरोग्य अधिकारी यांना सादर करावा. सदर करारनामा सादर न केल्यास आपले मानधन अदा केले जाणार नाही.

**अटी व शर्ती**

१) सदर सेवा अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने आपण पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झालेल्या दिनांकापासुन ते दि २९/०६/२०२६ या कालावधीकरीता राहिल.

२) सदर करारसेवेसाठी दरमहा एकुण रुपये ६०००० (अक्षरी: साठ हजार रुपये मात्र) इतका एकत्रित मोबदला दिला जाईल अन्य कोणताही भत्ता दिला जाणार नाही. तसेच मनपावर कुठल्याही प्रकारे दायित्व राहणार नाही.

३) हा प्रकल्प काही कारणाने बंद पडला अथवा कार्यक्रम कती आराखडयात नियुक्ति दिलेल्या पदास मंजुरी न मिळाल्यास आपली सेवा आपोआप संपुष्टात येईल

४) शासकिय सुटया व्यतिरीक्त एक दिनदर्शिका वर्षात फक्त ८ दिवस नैमित्तीक रजा व ७ दिवस वैदयकिय रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणतीही रजा देय नाही.

५) आपण आपले कर्तव्य दरमहिन्याच्या व वर्षाच्या इष्टांकानुसार पुर्ण करणे अपेक्षित आहे. आपणास नियुक्त केलेल्या शहरी सामुदायिक आरोग्य केंद्राचे बालरोग कक्षाचे Key performance indicators, SLA,Outcomes & indicator wise target प्रमाणे कामकाज करणे आपणाकडुन अपेक्षित आहे. वार्षिक उददीष्टांमध्ये लक्षणीय सुधारणा करणे अपेक्षित आहे.तसेच आपल्या प्रत्येक महिन्याचा तपशिल अहवाल सार्वजनिक आरोग्य विभाग,मुख्य कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

६) बालरोग तज्ञ यांना दिलेल्या ठिकाणी राष्ट्रिय शहरी आरोग्य अभियान तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

७) मा. शासनाच्या निर्देशानुसार नवजात शिशु कक्ष व्यवस्थापन, रुग्णसेवा, एस.एन.सी.यु. संबधित सर्व अहवाल केंद्र शासन, राज्य शासन पोर्टलवरती नियमित भरणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे रजिस्ट्रेशन नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.

९) मार्गदर्शक सुचनेनुसार आपणास दर दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी हजेरी पत्रकावर स्वाक्षरी तसेच बायोमेट्रीक (सेल्फि) करणे बंधनकारक आहे. अन्यथा आपले मानधन अदा केले जाणार नाही.

१०) वार्षिक उददीष्टाप्रमाणे कार्यमुल्यांकन अहवालानुसार (Performance Report) कामकाज पुर्ण करणे आवश्यक राहील.कामकाज असमाधानकारक असल्यास नियुक्ति संपुष्टात आणण्यात येतील.

११) जर करारसेवा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा वैदयकिय आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडे एक महिना अगोदर नोटीस दयावे लागेल अन्यथा एक महिन्याचा मोबदला भरावा लागेल

१२) या सेवा करार पध्दतीच्या असल्याने कायम स्वरुपी नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.

१३) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा येत नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही.

१४) करार सेवा कार्यभार सांभाळताना शासन अथवा खाजगी मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जे नुकसान होईल त्यांची संपर्ण जबाबदारी करार सेवकावर राहिल. सदर नुकसानीची भरपाई न केल्यास वसुली जमील महसुल वसुली पध्दतीने करण्यात येईल.

१५) अ) केंद्रशासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास त्यांची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ सेवा समाप्त करण्यात येतील.

ब) योजनानिहाय आढावा घेऊन आवश्यकतेनुसार कर्मचारी यांना एका ठिकाणाहुन दुसया ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येईल.

sd/-
वैदयकिय आरोग्य अधिकारी
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

१) मा आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा आ अ मुंबई
२) मा आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक
३) निवासी वैदयकिय आरोग्य अधिकारी, हिदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय, नाशिक रोड.